आपलो जन्मदत्त प्रतिभाला विस्तारित अना विकसित करता करता हरेक प्रतिभावान व्यक्तीन् आपलो स्वभाव, बर्ताव, सहजभाव, आत्मभान इ. को भी सकारात्मक विस्तार अना विकास करे पाह्यजे। नहीत् प्रतिभावान व्यक्तीको प्रतिभाला अकारणच ग्रहण लगत् जासे। मुनस्यारीच आपलो जन्मदत्त प्रतिभा को इस्तेमाल नकारात्मक, हिंसात्मक, द्वेषात्मक, असहिष्णुतापूर्वक, ऋणात्मक तरीकालका करस्यानी विनाशक, विघातक, अहंकारी व्यक्ती नही बने/होये पाह्यजे। आपलो जन्मदत्त प्रतिभाला अहंकारको नही नम्रभावको, सर्वहितको गहेना पेहराये पाह्यजे। फलेव्, फुलेव् झाड झुकत जासे अना बिना फल-फुलको झाड अनखी अनखी अकडत जासे, येव् त निसर्ग/प्रकृति को नियमच् आय्। मुनस्यारीच प्रतिभावान व्यक्तीन् आपलो नम्रभावला, बंधुभावला, सहिष्णुतला, शांतिपूर्ण सहअस्तित्व को भाव ला, मानुसकीला नही त्यागे पाह्यजे। आमरो पौराणिक महाकाव्य रामायण अना महाभारत को अभ्यास भी आमला येवच् सांगसे, का रावण अना दुर्योधन न् आपलो जन्मदत्त प्रतिभा को इस्तेमाल नकारात्मक, अहंकारमय, अकड़-संपृक्त, स्वार्थलिप्त, तुच्छतामय, ऋणात्मक तरीकालका करीन् अना येवढा प्रतिभा का धनी भी आखिर मा मातीमोल भय् गया। रावण द्वारा रचित शिवस्त्रोत अना रावणसंहिता अज् भी गायी, बाची, अभ्यसी जासेती, पर रावणको अनुयायी बनन् की कोनीकीच् इच्छा नही रव्ह्। येतरो महत्व रव्ह् से प्रतिभावान को स्वभाव अना बर्ताव ला भी। मुनस्यारीच आपलो जन्मदत्त प्रतिभा को इस्तेमाल करतानी आपलो मानुसपनला तथा पौराणिक इतिहास ला भी नही भुले पाह्यजे, असो मोल लगसे।

तसेच ''लय'' या संकल्पना स्वसंवेद्य से, मूनस्यारी वा गद्य या पद्य असो भेद नही कर. गद्यलिखाणामा भी यदि लय नही रहे त् वू गद्य लिखाण बोजड होसे, बोर करसे, ओघवतेपण नही रव्ह् वोन् लिखाण मा. पर्यायस्वरूप रसिक/वाचक वू गद्य लिखाण बाचनसाठी बिचक् सेत्. विचारक बा.सी. मर्ढेकर इनका (१) ललित वाङ्मय कृतीचा घाट, अना (२) लय तत्त्वाचे तीन नियम ये दुयही लेखव कोनीलाभी बाचता आयेत्. मर्ढेकर इनन् लय तत्त्व का तीन नियम असा सांगी सेन् ... संवाद नियम, विरोध नियम, अना समतोल नियम. लश सिद्धांत को कोनी भी अभ्यासक ला मर्ढेकर का ये बिचार अभ्यासता आय् सक् सेत्.

तसोच् येन् विषयको प्राथमिक अभ्यास साठी रसिक/वाचक ला भगवतीचरण वर्मा इनको हिंदी ग्रंथ 'साहित्य के सिद्धांत तथा रूप' अना प्रा. रतन कुमार पाण्डेय इनको भी हिंदी ग्रंथ 'आलोचक और आलोचना के सिद्धांत' भी बोहत मददगार साबित होय् सकेती. येकोसाठीच् अनखी वसंत दावतर येन मराठी को विद्वान समीक्षक, लेखक, संपादक द्वारा संपादित मराठी नियतकालिक ''आलोचना'' का अंक मंगायस्यार बाचे पाह्यजे असी मोरी सिफारस रहे असी मोरी सिफारस रहे. (आलोचना येव् नियतकालिक आब् बोहत पह्यलेच बंद भय् गयी से, तरी वोका वय् पुराना अंक अभ्यासासाठी उपलब्ध होय सकेती. येको बादमा कोनी भी अभ्यासकईनका, जेला काव्यशास्त्र को जनक मानेव् जासे असो, भरतमुनि को ''नाट्यशास्त्र'' येन् ग्रंथ मा काव्य को बारामाको विवेचन/विश्लेषण अभ्यासता आये. संगमाच् आनंद वर्धन को ''धन्यलोक'' येन् को साथ साथ आचार्य कुंतक को वक्रोक्ति सिद्धांत को अभ्यास भी बोहूत सहायक होय् सके.

वोन् स्पर्धक भाऊ को बोहत बोहत धन्यवाद, काहे का उनको अति-प्राथमिक टिपणी को कारणलका मोला येव् काही सटरफटर सांगता आयेव्.

धन्यवाद स्पर्धक भाऊ! अना, चूक-भूल साठी क्षमस्व!

पवारी / पोवारी बोली : ओळख



प्रा. डॉ. अशोक राणा,
यवतमाळ

पवारी बोली व तिचे महत्व

पवार किंवा पोवार हे कळ भारतातील बहुतांश जातींमध्ये आढळते त्याचप्रमाणे या कुळातील लोक जगातील बहुतांश देशांमध्येही आढळतात. त्यामुळे 'पुर्थई भया पँवार' हा वाक्प्रचार रूढ झाला. परंतु पवार या कुलनामाचे एका जातीत रुपांतर झाले त्यामुळे पवार ही एक जात सुद्धा आहे. मध्यप्रदेशात नदीच्या काठावर वसलेले या अर्थाने ताप्ती तटीय, तवा तटीय, बेतवा तटीय, क्षिप्रा तटीय, नर्मदा तटीय, सिंधू तटीय, गंगा तटीय तसेच महाराष्ट्रात वर्धा तटीय आणि वैनगंगा तटीय असे पवारांचे दोन प्रमुख जातीसमूह अस्तित्वात आहेत. त्यांना अनुक्रमे भोयर-पवार किंवा पवार किंवा पोवार या शब्दांनी संबोधले जाते. त्यांच्या वेगवेगळ्या बोली व सांस्कृतिक वैशिष्ट्ये सुद्धा आहेत.

हेमंत कुकरेती संपादित 'भारतकी लोक-संस्कृती' या ग्रंथामध्ये याविषयी माहिती देताना पवारी लोकसाहित्याच्या गद्यप्रकारात - 'मुहावरे, कहावतें, लोकोक्तियाँ, लघुकथाएं, पवारी-सास्तर, पहेलियाँ - (बौद्धिक वृद्धि हेतु) तसेच अड़ंगे-प्रश्नोत्तर पद्धति (अड़वाथा)', यांचा समावेश होत असल्याचे अधोरेखित केलेले आहे. याविषयी ते म्हणतात (कुकरेती, २०१८:) -

''उपरोक्त प्रकार का लोक-साहित्य (वाचिक साहित्य) सतपुड़ान्चल के उन तमाम ग्रामीण अंचलों में विस्तारित हुआ है, जहाँ पवारी बोली बोलनेवाले (मालथी तथा निमाड़ी की तरह) लाखों लोग रहते हैं और गाँव गाँव में लोक-जीवन के विविध रंगों को जन्म होने से लेकर मृत्युपर्यंत तक, लोक-गीतों, लोक-कथाओं, गाथाओं, पहेलियों, सजनगोटो, मुहावरों, लोकोक्तियों, विवाह-गीतों, पालना गीतों, ऋतु गीतों, श्रम-गीतों, बाल-गीत सास्तर एवं वीर काव्य एवं गोन्दर गीत व कथाओं व् भजनों व् सूदन-गीतों (मृत्यु गीत) के रूप में गाए व् सुनाए जाते हैं। इन गीतों, कथाओं के अतिरिक्त पवारी लोक संस्कृति लोक-कला, लोक नृत्य तथा लोक मनोरंजन व बाल गीत आदि प्रचुर संख्या में मध्यप्रदेश के इस सतपड़ा-पर्वत श्रृंखला की तलहटी में बसे क्षेत्र के लोगों में बहुत प्रचलित है।

पवारी बोली तथा उसका लोक-साहित्य-संसार प्रदेश और देश की अन्य बोलियों व भाषाओं के समकक्ष ठहरता है और भविष्य में इसके वाचिक-साहित्य का संकलन, संग्रहण, प्रकाशन व लेखन निरन्तर होता रहेगा, ऐसी आशा की जानी चाहिए। जिस तरह कोई समाज देरी से जागता और अपनी भाषा-बोली, कला व संस्कृति पर गर्व नहीं करता है तो यही लेट-लतीफी देखने को मिलती है। इस बोली का हश्र और इसकी कला-संस्कृति का अस्तित्व समाप्त होने की कगार पर आ जाता है, तो कोई मसीहा आता है और तब लोक जाग्रति, लेखन और लोक संस्कृति व् साहित्य को संग्रहित कर लोगों के सामने जाते है।''

उपरोक्त अवतरणामध्ये पवारी बोलीचे महत्व सांगताना ही हिंदी भाषेची एक बोली म्हणून मानली गेल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्याच्या तिरोडा तालुक्यातील गुमाधावडा येथील गणेश हायस्कुलच्या प्रांगणात क्षेत्रिय पवार महासभाप्रणित राष्ट्रीय पवारी साहित्य कला संस्कृती मंडळाच्या वतीने ३ फेब्रुवारी २०१९ रोजी आयोजित पहिल्या अखिल भारतीय पवारी साहित्य संमेलनामध्ये संमेलनाध्यक्षपदी असलेल्या पोवारी बोलीभाषेच्या अभ्यासक प्रा. डॉ. मंजू अवस्थी यांनीही तसेच प्रतिपादन केले होते. त्या यावेळी म्हणाल्या की (अवस्थी,म.टा.) - ''देशातील विविध प्रदेशात बोलीभाषांमधून संवाद साधून आपसातील व्यवहार केले जातात, प्रमाण भाषेपेक्षा बोलीभाषा ही सोपी असल्याने या बोलीभाषेच्या संवर्धनासाठी प्रत्येक समाजाला झटणे गरजेचे आहे. पोवारी बोली भाषा ही देशातील महत्वाची भाषा असून राष्ट्रीय स्तरावर ४६ व्या क्रमांकावर या भाषेचे स्थान आहे. पोवारी बोलीभाषेमध्ये राजस्थानी, गुजराती, गोंडीसह जैन संस्कृती मिसळली गेली असून त्या भाषेने पोवारी बोलीभाषेतील काही शब्दांना आपल्यात सामावून घेतले आहे. अशा पोवारी

बोलीच्या संवर्धनासाठी मात्र समाज कुठे तरी मागे पडल्याने गेल्या एक दशकाचा विचार केल्यास पोवारी भाषेचा ऱ्हास झाल्याने ही भाषाच लुप्त होण्याच्या मार्गावर आली आहे.'' या पोवारी भाषेच्या संवर्धनासाठी समाजाच्या वतीने आयोजित केलेले हे पहिले साहित्य संस्कृती संमेलन मोलाचे ठरणार असून पोवारी बोलीभाषा ही बुंदेली भाषेची उपभाषा असल्याने या भाषेला अनन्य महत्व असल्याचे त्यांनी सांगितले.

पुढे बोलताना त्या म्हणाल्या की, आपण जेव्हा उत्तरप्रदेशातील बनारस येथून बालाघाट शहरात १९७१ ला पहिल्यांदा आले तेव्हा बालाघाटच्या भाजीबाजारातील विक्रेत्यांकडून पहिला शब्द कानावर पडला आणि तो म्हणजे भेदरा व संभार. या शब्दामुळे माझ्या मनात नवीन उत्कंठा निर्माण झाली की हे शब्द कुठले आहेत, कोण बोलतात याचा अभ्यास करायला पाहिजे. तेव्हापासून मी आजपर्यंत पोवारी बोलीभाषेच्याच नव्हे तर मराठी व लोधी भाषेच्या शब्दसंग्रहाचाही अभ्यास केला. तो अभ्यास करीत असताना पोवारी बोलीभाषेतील सुमारे १२ हजार शब्द एकत्र करून त्यांच्यावर अभ्यास सुरू केला आणि १९९२ ला पहिला शोधप्रबंध या भाषेवर अलाहाबाद विद्यापीठात सादर केला. तेव्हा तेथील प्रध्यापकांनाही पोवार किंवा पवार ही जात अस्तित्वात आहे हे माहिती नव्हते असे म्हणाल्या.

पोवारी बोलीभाषा ही मधुर व कोमल अशी भाषा असून सर्वांना आपल्याकडे आकर्षित करणारी भाषा आहे. त्यामुळेच या बोलीभाषेचा प्रभाव हा गुजराती, राजस्थानी, गोंडीसह जैन समाजाच्या भाषेवर दिसून येतो. पवारी भाषेचे अस्तित्व केवळ पोवारबहुल क्षेत्रातच आहे असे नव्हे तर संपूर्ण भारतात ती तुम्हाला कुठल्या न कुठल्या भाषेच्या माध्यमातून दिसते. हा समाज एक सुसंस्कृत समाज असून महिलांना मानाचे स्थान देणारा समाज आहे. सून व मुलीं चा सन्मान करणारा हा समाज असून दहेज परंपरेच्या विरोधातील समाज आहे. या समाजाने आपलेपणाने आपली भाषा आजही ग्रामीण भागात जोपासून ठेवली आहे. मात्र जस-जसे या समाजाचे शहरीकरणात रुपांतर होत गेले, तस-तशी पोवारी बोली भाषा संपुष्टात येऊ लागली, हे वास्तव असल्याचे त्या म्हणाल्या. आपल्या बोलीवर कुणाचा प्रभाव नसायला हवा तर गर्व असायला हवा. या समाजातील ग्रामीण संस्कृतीची ओळख म्हणजे खाचर, गरसोली, लुगडा ही आहे. जगातील पहिले लोकगीत सुद्धा पोवरीत गायले गेल्याचा उल्लेख त्यांनी करीत आपण पोवारी बोलीवर केलेला शोधप्रबंध आज या साहित्य संमेलनाच्या माध्यमातून समाजला समर्पित करीत आहोत असे त्या म्हणाल्या.

या संमेलनामध्ये गणेश देवींच्या बोलीभाषाविषयक प्रकल्पात चुकीची 'पोवारी' असल्याचा आरोप डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे यांनी केला. बोलीभाषेचे १९१७ मध्ये पहिल्यांदा सर्वेक्षण झाले. त्यानंतर तब्बल १०० वर्षांनी २०१५ मध्ये बोलीभाषेचे सर्वेक्षण करण्यात आले. हे सर्वेक्षण करताना ज्ञानेश्वर टेंभरे यांनी पोवारी बोलीभाषेचा इतिहास समोर आणला. सोबतच त्यावर संशोधनही केले त्याचा नामाल्लेखही सर्वेक्षणात नाही. याउलट पोवारीचा गंध नसलेल्या पुण्यातील गणेश देवी आणि जाखडे यांची नावे देण्यात आली. त्यांनी ११ पानांमध्ये पोवारीचे विश्लेषण करताना चुकीचा इतिहास जगासमोर मांडला, असा खळबळजनक आरोप महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य लखनसिंह कटरे यांनी केला. 'पोवरी भाषा, कला, संस्कृती व संवर्धन' या विषयावरील आयोजित परिसंवादात ते बोलत होते. कटरे म्हणाले, संस्कृत ही भाषा नव्हे तर वेगवेगळ्या तुटक भाषा आणि शब्दांना एकत्र करून तयार झालेली आहे. व्यवहारात या भाषेचा वापर करीत असला तरी आज घडीला महत्त्वाच्या ठिकाणी ती पोहचली आहे. याप्रमाणेच पोवारी बोलीभाषाही एक टप्पा गाठू शकते. त्यासाठी शब्दसंग्रह साठवून ठेवण्याची गरज आहे, असे मतही त्यांनी मांडले.

डॉ. अवस्थी यांनी हिंदी भाषेतील एक बोलीभाषा म्हणून पवारी बोलीचा अभ्यास केला. कारण की, त्यांच्यासमोर हिन्दी भाषिक पवार समाज होता. परंतु बालाघाट, बैतूल व छिंदवाडा या मध्यप्रदेशाच्या जिल्ह्याला लागून असलेल्या महाराष्ट्रातील पवार समाजाची पोवारी बोली स्वाभाविकपणे मराठी भाषेची बोली मानली गेली. या दृष्टिकोनातून नागपूर विद्यापीठातील भाषाविज्ञानाचे प्राध्यापक डॉ.सु.बा. कुलकर्णी यांनी पोवारी बोलीचे संशोधन केले. या संशोधनात त्यांनी या बोलीची काही वैशिष्ठ्ये सांगितलेली आहेत.

पवारी बोलीचा अभ्यास

डॉ. कुलकर्णी यांनी वैनगंगा तटीय पोवार

समाजाच्या बोलीचा अभ्यास करून तिच्याविषयीची आपली निरीक्षणे नोंदविली आहेत. ते म्हणतात (कुलकर्णी, १९७२:प्रस्तावना)-

''पोवारांची वसती महाराष्ट्रातील भंडारा व गोंदिया जिल्ह्यात केंद्रित झालेली असून ती अंदाजे दोन लाख इतकी आहे. मध्यप्रदेशातील बालाघाट व सिवनी या जिल्ह्यातही त्यांची काही वसती आहे. बालाघाटकडील पोवारी बोलीवर पूर्ण हिंदीचा प्रभाव आहे, तर भंडारा-गोंदियाकडील पोवारीवर नागपुरी व चंद्रपुरी झाडी मराठीचा.''

या अवतरणात पोवारांची वस्ती दोन लाख असल्याचा उल्लेख - ज्या काळात डॉ. कुलकर्णी यांनी प्रस्तुत संशोध केले; त्या काळातील म्हणजे १९६५ च्या दरम्यानचा आहे (नागपूर विद्यापीठाने त्यांचा 'पोवारी बोली' हा शोधनिबंध १९७२ मध्ये प्रकाशित केला होता). आज या संख्येत खूपच वाढ झालेली आहे. सरकारी खानेसुमारीनुसार आज ३८-४० लक्षापर्यंत पोवारांची संख्या असून त्यापैकी केवळ चार लक्ष पंचवीस हजार सातशे पंचेचाळीस पोवार लोक आपल्या पोवारी बोलीचा वापर व्यवहारात करतात. अशा या पोवारी बोलीविषयी डॉ. कुलकर्णी म्हणतात की (कुलकर्णी, २००१:७)

''पोवारी ही एक जातिबोली आहे. जात हे रक्ताच्या नात्याने व अंतर्विवाह नियमाने बांधलेले व्यातमुख सामाजिक संघटन असते. यामुळे जातिबोली या अधिक आदानशील असतात व त्वरेने परिवर्तित होत जातात. जातीच्या तुलनेने जमात हा अधिक सुसंहत व दृढ सामाजिक गट असतो. त्यामुळे जमातबोली या कमी परिवर्तनशील व आर्ष असतात. जातिबोली व जमातबोली यामधील परस्पर भाषिक व्यवहारामधून प्रादेशिकतेच्या आधारावर क्षेत्रबोली निर्माण होतात. नागपुरी, चंद्रपुरी (झाडी), वऱ्हाडी, पुणेरी या क्षेत्रबोली होत. क्षेत्रबोलीतील एखादी बोली शिष्टमान्य होऊन लेखन व्यवहाराचे माध्यम बनते व प्रमाणबोलीच्या पदवीस पोहोचते. ऐतिहासिकता व प्रामाण्य या आधारावर ती भाषा म्हणून ओळखली जाते. भाषेचे व्यवसाय, कार्यक्षेत्र, वय, लिंग इ. आधारांवरही प्रभेद संभवतात.'' पोवारी बोली ही एक जातिबोली आहे याविषयीचे विवेचन करताना डॉ. कुलकर्णी यांनी तिचे स्थान या ठिकाणी निश्चित केलेले आहे.

पोवारांचे मूळ मध्यप्रदेशातील माळवा प्रांतात असून परमार वंशीय राजा भोज यांच्या घराण्याशी पोवार लोक आपले नाते सांगतात. अकराव्या शतकात धारच्या परमार राजांच्या मांडलिकीखाली नागपूरकडील प्रदेश होता. त्यामुळे माळव्यातील पोवार विदर्भात आलेत. त्यांचे विदर्भातील स्थलांतर बराच काळ चालू राहिले, तसे ते आजही चालूच आहे. त्यामुळे त्यांच्या बोलीचे मूळ माळवी स्वरूप पार बदलून गेले आहे. नागपुरी आणि झाडी बोलीतील बरीचशी वैशिष्ठ्ये तिच्यात आढळतात.

पोवारी बोलीची वैशिष्ठ्ये

डॉ. सु.बा. कुलकर्णी पोवारी बोलीविषयी पुढे म्हणतात (कुलकर्णी,२००१:७) -

''पोवारी बोलीची स्वर व्यवस्था अधिकांश हिंदी भाषेप्रमाणेच आहे. या बोलीत 'ळ' हा ध्वनी नाही. मराठी ऋण शब्दातील 'ळ' कारचा 'र' कार करण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे होळीची होरी होते व शेळीची सेरी होते. झोळी, माळी, सुतळी, सारवळी, रामफळ हे शब्द झोरि, मारि, सुतरि, साकरि, रामफर असे होतात. कधीकधी 'ळ' चा 'ड' देखील होतो. उदा. उथळ चे उथड व धर्मशाळा चे धरमसाडा असे रूप होते. शब्दारंभीच्या व चा ब होतो. जसे - वेळू : बेरू, वाळू : बारू, विहीर : बिहिर.''

पोवारी बोलीवरील हिंदी भाषेचा प्रभाव हा पोवारांच्या मूळ हिंदी भाषिक प्रदेशातील स्थलांतराचा परिणाम आहे. त्याची परिणती पोवारी बोलीच्या ध्वनीप्रक्रियेत झालेली दिसून येते. तिच्याविषयी डॉ. कुलकर्णी म्हणतात (कुलकर्णी,२००१:७)-

''पोवारांच्या बोलीत 'श' हा ध्वनी नाही. शकाराचा सकार करण्याची प्रवृत्ती दिसून येते. यामुळे शिंगाचे सिंग व शेंगेचे सेंग होते. दन्त्य आणि तालव्य स्पर्शसंघर्षी ध्वनींमध्येही व्यवच्छेद आढळत नाही. प्रायः मुक्त-परिवर्तनच आढळते. त्यामुळे मराठीतील चांदी, चाळण, चवळी, चरखा, जांभई, जावई, जुना, झोप, झाकणी यांसारखे शब्द पोवारीत चांदि, चारनि, चवरि, चरखा, जांबइ, जुना, झोप, झाकनि याप्रमाणे उच्चारले जातात. या बोलीत 'ण' हा ध्वनी नसल्याने बाणाचा बान बनतो व वेणीची बेनी बनते. शब्दारंभीच्या 'ए' आणि 'ओ' या स्वरांना 'य' आणि 'व' असे आगम होतात. यामुळे एकाचा येक व ओठाचा वठ होतो.''

हिंदी भाषेची भाषिक वैशिष्ठ्ये आत्मसात केलेला पोवार समाज आपली नाळ विदर्भातील नागपुरी

तसेच झाडी बोलीशी जोडून घेण्याच्या प्रयत्नात आपली भाषाच गमावून बसला आहे. पोवारीतील लिंग व्यवस्था हे त्याचे एक उदाहरण आहे. त्याविषयी डॉ. कुलकर्णी म्हणतात (कुलकर्णी,२००१:७) -

''पोवारीत हिंदीप्रमाणे पुल्लिंग आणि स्त्रीलिंग अशी लिंगे आहेत. या बोलीत आंगन, कनिस, घुबड, चमडा, जंगल, जाम्बुर इ. मराठीत नपुंसकलिंगी असणारे शब्द स्त्रीलिंगी आहेत. तर नाक, पदक, परसाद, सरन, मालिस यासारखे शब्द स्त्रीलिंगी आहेत. सामान्यतः पुल्लिंगी नामे अकारान्त व स्त्रीलिंगी नामे इकारान्त असत. विशेष म्हणजे, या बोलीत नामांना वचनविकार होत नाही. यामुळे येक घर, दुय घर, येक टुरा, दुय टुरा असेच अविचल रूप राहते. नामांचे सामान्य रूपही होत नाही. षष्ठीचा प्रत्यय 'को' तर सप्तमीचा 'मा' असा आहे. जसे - उनको नवकर, ओको बाई, हातमा, बगिचामा. पोवारी बोलीत 'ऊ' हे तृतीय पुरुषवाचक पुल्लिंगी सर्वनाम आहे. स्त्रीलिंगी सर्वनाम 'वा' असे आहे. उदा. उ इस्कुल्या गयो वा आपलो मायकर गयिसे. उ कोनको घर आय? वा मोरि पुस्तक आय.

पुल्लिंगी विशेषणे ओकारांत असतात, तर स्त्रीलिंगी इकारान्त असतात. जसे - कारो, पिवरो, थोडो, चांगलो : कारि, पिवरी, थोडि, चांगलि.''

पोवारीतील लिंग व्यवस्था अशा रितीने हिंदी भाषेशी निगडीत असली तरी तिच्यावर गुजराथी भाषेचा प्रभाव असल्याचेही दिसून येते. पोवार हे मुळात गुजरातमधून मध्यप्रदेशात आलेले अहेत. त्याचप्रमाणे विदर्भात येताना त्यांचा संबंध मध्यप्रदेशातील छत्तीसगड प्रांतातील बंगाली प्रभावित छत्तीसगडी बोलीशी आला असणे स्वाभाविक आहे. अशा संमिश्र स्वरूपाच्या पोवारी बोलीला स्थानिक लोक हेंगडी बोली म्हणून हीणवीत असतात. काही पोवारांनाही त्यात तथ्य असल्याचे वाटते. म्हणून ते ही बोली बोलण्यास संकोच करतात. पोवारीतील क्रियापदे सुद्धा तिच्यावरील गुजराथी भाषेचा प्रभाव स्पष्ट करण्यास मदत करतात. डॉ. कुलकर्णी त्याविषयी म्हणतात (कुलकर्णी,२००१:७)

''क्रियापदाची भूतकाळी रूपे कहिस, करिस, बुलायिस, बेचिस, पाडिस अशी होतात. भविष्यकाली रूपे भुक से मार से, पड से, आवडसे अशाप्रमाणे होतात. भविष्यकाळी रूपे पुरुष व वचन या आधारांवर फिरतात. जसे : उ टाके, आमि टाकबिन, वा टाकसे व टाकसेति.'' क्रियापदाच्या 'आमि टाकबिन' या रूपावर स्पष्टपणे बंगाली भाषेचा प्रभाव असल्याचे दिसून येते. हीच रूपे छत्तीसगडी बोलीतही आढळतात. पोवारीने तिचा प्रभाव आत्मसात केलेला आहे. या प्रभावाचे मूर्त स्वरूप म्हणजे पोवरी कविता.

मराठी कवितेत प्रस्थापित झालेले प्रख्यात कवी मा. लखनसिंह कटरे यांनी नियतकालिकांच्या माध्यमातून सुदूर मराठी भाषिकांपर्यंत अस्सल व अव्वल पोवारी कविता पोहोचविली आहे. त्याचप्रमाणे 'पोवारी बचाव' अभियानाचे प्रवर्तक मा. जयपालसिंह पटले यांनी गीता, रामायण, ग्रामगीता इ. काव्य ग्रंथांचे पोवरी बोलीत रूपांतर करून स्वतंत्रपणे आपल्या पोवारी बोलीत काव्य रचनाही केलेल्या आहेत. तसेच पोवारी लोकगीतांचे संकलनही ते करीत आहेत. पोवार समाजाचे नेते व नागपूर विद्यापीठातील माजी कीटकशास्त्रज्ञ डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे यांनी 'गुंज उठी पवारी' आणि 'बुलंद करो पवारी' (टेंभरे) ही दोन काव्य-कथाविषयक पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. देवेंद्र चौधरी यांचा 'मन को घाव' हा काव्यसंग्रह पोवारी बोलीचे वैभव वाढविणाराच आहे. याशिवाय अनेक पोवारी कवी अ.भा.मराठी साहित्य संमेलनासारख्या प्रस्थापित व्यासपीठांवरून पोवारी कवितेचा आवाज बुलंद करीत आहेत. ✦

होरी (रंगपंचमी)

फाल्गुन महिनामा होलीको सण (त्योहार) आवसे ।
रंगबिरंग लका सबको चेहरापर मुस्कान भर देसे ।
पोर्णिमा चंद्रमा को मां होलीका पवित्र अग्नि मां जरसे ।
करंजी पपडी पुरन पोळीको भोग लगसे ।

भक्त प्रल्हाद क भक्ति को शक्ती
लका, होलीका राक्षसी नष्ट होसे।
म्हणुन हर साल बुराईपर मात देन।
होली सण आवसे।

येन पवित्र अग्नि मां निराशा,
दरिद्रता, आलस, बुरा विचार,
होलीका दहन पवित्र अग्नि मां
स्वाहा होय जासे।

येन होलीका को हर्ष बेलापर सबला खुशी मिले अपार ।

सौ. उषा रमेशजी पटले, नागपुर

आमी आमरी मायबोली भूल्या त् सब खोय देया..!



प्रा. अलका चौधरी, बालाघाट

मोला याद आवसेत जुना दिवस जब् आमी माय-बाप संग बस, रेलगाडीलक जात होता। तसोच दवाखाना अना बजार जात होता। वोनो बेरा बस इस्ट्यांड, रेलवे ठेसन, दवाखाना, दुकान वगैरे मा आमरा माय दादाजी पवारी/पोवारी बोली मा बोलत अना आजुबाजु का लोक खिलखिलायकन हासत। आमला भी आमरी बोली बोलन लाज लग् अना आमि लोकलाज मुहुन मराठी या हिंदी मा बोलत होता!

आब् सुशिक्षित जमानो मा आमी माय-बाप आपलो टुरा-टुरीइन को इस्कुल, आफिस, पार्टी वगैरे मा संग गया त मराठी-हिंदी मा बोल् सेजन अना आमरा कानवेंट मा अना उचो सिक्सन लेयस्यानी हाय-फाय कंपनी मा नोकरी करनेवाला जवान इंग्रजी मा बोल् सेत। आमला मराठी-हिंदी मा बोलताना देख उनका संगी-साथी हास् सेत, आमला हिन भावनालक देख् सेत। आमरा टुरुपोटु लाजत आमला एखांड आडप मा लेजाय इंग्रजी मा बोलो नही त चुपचाप रहो, यहां हाय प्रोफाईल का लोक सेति मुहुन साग्सेत। वय हिन भावना लक आमरो कन देख् सेति असो सुनाव् सेत। वय भी अंगरेजी मा बोल् सेति। काहे का उनला आपलो देसी भाषा मा बोलनो कमीपना लगसे। सरम-लाज लगसे।

पर जब् वय देखसेत का उच्च सिक्सित लोक भी घर, आफिस, बजारहाट मा गुजराति, मारवाडी, सिंधी, पंजाबी, मैथिली, भोजपुरी, बंगाली, छत्तिसगड्डी, तामिल, कन्नड, मलयालम, तेलगु मा बोलसेत त मन मा दुखी होसेत का आमला मायबोली बोलता नही आव्, केतरा दुरभाग्यस्याली सेजन!

जब् वय विदेस जासेत तब् भी वहान को लोकहिनला आपलो मायबोली मा बोलताना देख आपलोपर गुस्सा आवसे का आमी आपलो मायबोली ला, मातृभाषा ला नाहक त्याग देया, भुलाय देया। वात् आमरी गौरव आय, आमरी पैचान आय, आमरो समाज क अंतरमन को आरसा आय! अना मन को मन मा रोव् सेजन।

तब् बिचार करेपर समज मा आवसे का आमरा टुरुपोटु आपला रीति-रिवाज, रहन-सहन, आवभगत का नियम-धरम सोरस्यानी पसचिम संस्कृति, सभ्यता की नकल काहे नवो जनरेसन मा बढ रही से। वय काहे आपली संस्कृति, समाज, यहांवरी का मायबाप, भाईबंध ला तुच्छ समज डोरा मुंदकन दुसरोइन की नकल कर रह्या सेति? एको एकच कारण से का आमी आपलो मायबोली ला भुल गया त रिस्तानाता, रिति-रिवाज, संस्कृति-सभ्यता सब भूल गया। दुसरो अ.भा. पवारी साहित्य संमेलन ला शुभकामना। ✦

गजल पिरेम की

करो एक वादा वोला तुम्ही निभाओ
कभी द्वेष की ना दुकान सजाओ ।
जीवन मा सुख दुख तो आवनो जानो से
दुसरो को दुख मा ना तुम्ही सुख मनाओ ।
अगर अना मगर आवता जाता रहेती
सदा जीवन मा खरो ला साथी बनाओ ।
दुख मा भी सुख की झलक देख लेओ
खुशी इनला बाटो सदा मुस्कुराओ ।
रुस् नही जप, दिन मा मिले ना चैन
पिरेम को होसे काहे दुश्मन जमानो ।
भीतरलक उठसे आग दुख की
लिखेव पियार को तरि भी मीन् तराना ।
आवाज मोठी सुकुन अलका देसे
गजल पिरेम की पिरेमल् गुनगुनाओ ।

- अलका चौधरी

जनसंदेश



इंजि. मुरलीधर टेंभरे,
अध्यक्ष, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा

बहुत खुशी को बात से कि राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा प्रणित पवारी साहित्य कला संस्कृति मंडल, भारत द्वारा दुसरो राष्ट्रीय अधिवेशन १९ दिसंबर २०२१ ला नागपुर (महाराष्ट्र) मा आयोजित करनो मा आय रही से. पोवारी/पंवारी/पवारी बोली भाषा, लोककला ना संस्कृति जो अज की आधुनिकता की चकाचौंध मा लुप्त प्राय होय रही से, येको जतन ना संवर्धन होये पाहिजे तसोच समयानुसार मूल स्वरूप कायम ठेयकन येको मा आवश्यक सुधार भी होये पाहिजे येकोसाठी राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा प्रयासरत होसे. येन प्रयासमा मूर्त रूप देनसाठी महासभा को अधिन एक समिति बने पाहिजे ना येन समिति को माध्यम लका येव काम होये पाहिजे असो उद्देश्य लक ४ नवंबर २०१८ ला राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा को अंर्तगत पवारी साहित्य-कला-संस्कृति मंडल की स्थापना करनो मा आयी. गयेव तीन सालमा येन मंडल को माध्यम लका साहित्य को क्षेत्र मा चांगलो काम भयेव. मंडल द्वारा वार्षिक पत्रिका पवारी साहित्य सरिता का दुय अंक प्रकाशित भया. पहिले अखिल भारतीय पवारी साहित्य सम्मेलन ग्राम गुमाधावड़ा, तह-तिरोड़ा, जिला गोंदिया (महाराष्ट्र) मा दि. ३ फरवरी २०१९ ला सम्पन्न भयेव.

दुसरो पवारी साहित्य सम्मेलन को आयोजन पवार मंगल भवन, कारंजा, जिला वर्धा (महाराष्ट्र) मा करन को तय भयो होतो, परंतु करोना को कारण येव सम्मेलन नही भयेव. आता दुसरो साहित्य सम्मेलन १९ दिसंबर २०२१ ला नागपुर मा आयोजित करन का तय भई से. येन दिवस पवारी साहित्य सरिता का तिसरो अंक प्रकाशित होय रही से. येकोसाठी मोरी शुभकामना.

येन तीन सालमा साहित्य को क्षेत्र मा चांगलों काम भयेव. कई साहित्यीक, कवि, गीतकार सामने आया. सभा-सम्मेलन, बैठक मा समाज जन पोवारी मा बोलन लग्या. पोवारी/पवारी बोली-भाषा को संवर्धन होये पाहिजे असी भावना सिर्फ बुजुर्ग समाज जन माच नही त नविन पिढ़ि मा भी जागृत भयी; या बहुत खुशीकी बात से.

पवार समाज का संस्कार अना पवारी संस्कृति येन क्षेत्रामा काम होनो बाकी से. समाज को विकास ना अस्तित्व साति जसो बोली भाषा को महत्व से असोच महत्व समाज की संस्कृति ना संस्कार की से. समाज की नवी पीढ़ि आपला जुना संस्कार. ना संस्कृति ला भूल नही गया बल्की वोला भूलावन की कोशिश कर रहया सेति. सुशिक्षित ना संस्कारित समाज आपलो आर्थिक विकास चांगलो कर सकसे. परंतू आज असो देखवनो मा आय रहि से कि आपलो समाज आपला संस्कार भूल रहया सेति ना दुसरों की देखवादेखवी कर बिह्या मा अनाप-सनाप पैसा खर्च करन लग्या. ''एक एकर जमीन बिकुन पर बाईको/भाऊको बिहया शानलक करून'' असी भावना समाज जन मा आय गयी. येको दुषःपरिनाम येव भयोव की समाज जन जवर ज्या पैतृक खेति एक धरोहर को स्वरूप मा होती वा बिकन लग्या. धंदा-व्यवसाय करनेवाला भी धंदा मा कमायोव पैसा बिह्या मा खर्च करन लग्या. नोकरीपेश्या वर्ग भी कर्ज काढकन बिह्या मा खर्च करन लग्या. येन कारण लका पोवार/पंवार समाज मा आर्थिक विपन्नता आय गयी. टुरा-टुरिन को शिक्षणसाठी ना धंदा-व्यवसाय साठी पैसा नही बच रह्या सेति. राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा न गयेव १०० साल मा बिह्या मा पैसा की बचत कर समाज जन नं शिक्षण पर ना धंदा-व्यवसाय पर खर्च करे पाहिजे येकोसाठी जन-जागरण करन को काम करीस अना आबन भी महासभा मार्फत जन-जागृति को काम चालु से.

२९ फरवरी २०२० ला महासभा को अखिल भारतीय अधिवेशन बैहर जिला बालाघाट (म.प्र.) मा सम्पन्न भयेव. येन अधिवेशन मा समाज सुधार विषय का प्रस्ताव पारित भया ना ओको पर जन-जागृति को काम अविरत चालु से. खासकर -

पवार समाज मा सांस्कृतिक एकरूपता रहे पाहिजे येको साठी नीति-नियम अना आदर्श आचार सहिंता.

पवार समाज का स्पस्ट नीति-नियम बन्या सेति. येन नीति-नियम को पालन कर पवार समाज न सामने बढ़ीसे. परंतू १०-१५ सालमा येंन नीति-नियम को पान कम भय गयी से. पहिले बिहया गोधुली बेला पर (सुर्यास्त को पहिले) लगन होता, परंतू आता बिह्या रात्री १०-१२ बजे पर्यंत लग सेति. समाजजन बिह्या को पहिले पाय लगनी मा रिंग सिरेमणी को कार्यक्रम करन लग्या ना येन कार्यक्रम मा चार चार पाच पाच सौ लोकहिन ला बुलायेव जासे. बिह्या मा १०००-२००० लोकहिन ला बुलायेव जासे. बिह्या को बादमा प्रितीभोज को आयोजन होसे. येनंप्रकार तक बिह्या मा तीन कार्यक्रम होन लग्या. ना बिहया मा अनाप-शनाप खर्च बढ़ गयेव ना समाज की आर्थिक परिस्थिति खराब होय रही से. म्हणून राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा नं. बैहर अधिवेशन मा सर्वसंमती लका प्रस्ताव पारित करी सेस कि,

१) रिंग सिरेमणी को कार्यक्रम नही करे पाहिजे, टीका लगाय कनच बिह्या पक्को करे पाहिजे.

२) बिह्या को कार्यक्रम गोधुली बेलापर सम्पन्न होये पाहिजे.

३) बिह्या मा डी.जे. को उपयोग बंद होये पाहिजे.

४) बिह्या मा कम से कम लोकहिनला बुलाये पाहिजे.

५) बिह्या मा सड़क पर/गल्ली मा नाचगाना बंद होये पाहिजे.

६) बिह्या को बादमा प्रितीभोज को कार्यक्रम नही होये पाहिजे.

७) बिह्या मा/अन्य कार्यक्रम मा नशा को सेवन बंद होये पाहिजे.

८) प्री वेडींग कोरियोग्राफी बंद होये पाहिजे.

अंत्यविधी

१) शव पर सिर्फ फुल ना फुलमाला चढ़ाये पाहिजे. शव पर पैसा नही चढ़ाये पाहिजे.

२) दिंड़ी-भजन संग शवयात्रा निकली पाहिजे.

३) शव दहन को कार्यक्रम सूर्यास्त को पहिले होय जाये पाहिजे.

४) शवयात्रा मा सिर्फ फुल च फेके पाहिजे. पैसा ना अनाज नही फेके पाहिजे.

५) तेरवी को कार्यक्रम नजदिकी रिस्तोंदार संग सम्पन्न करे पाहिजे. साधो जेवन देये पाहिजे. मिठो ना खारो पकवान नही देये पाहिजे.

येन प्रकारलका बिह्या ना अंत्यविधी को कार्यक्रम कर पवार समाज नं पैशा की बचन करे पाहिजे ना वो को उपयोग टुरा-टुरी को शिक्षण पर ना धंदा-व्यवसाय पर करे पाहिजे. असो करेलका आपले समाज की आर्थिक उन्नती होये ना समाज सामने बढ़े.

येन पवारी साहित्य सम्मेलन को माध्यमलका मी समस्त पवार/पोवार/पंवार परमार/भोयर पवार सब जन ला विनंती करू सु कि आमरी बोली-भाषा, संस्कार ना संस्कृति टिकावन की जवाबदारी सिर्फ कोणी एक संस्था किंवा संगठन की नहाय बल्की या जवाबदारी समस्त समाज जन की ये. सामने आवो सब जन या जवाबदारी आयी निभाव बिन.

मुहुन पवार समाज एक सुसंस्कारित, सुसंगठीत, सुशिक्षित, समृद्ध, संबल एकसंघ समाज बने पाहिजे अना येव समाज नं भूत काल मा भारतवर्ष साठी एक मार्गदर्शक की भूमिका निभाईस तसीच भूमिका वर्तमान ना भविश्य मा भी निभावन की स्थिति मा आये पाहिजे असी मी कामना करू सु.

येनं पवारी साहित्य सम्मेलन को माध्यम लका पवार समाज को लेखक, कवि, गीतकार, कलाकार इन ला आपली प्रतिभा उजागर करन को मौका मिले ना अुन की प्रतिभा मा निखार आये असी मी कामना करू सु.

येनं अ.भा. पवारी साहित्य सम्मेलन को आयोजन की जवाबदारी पवार समाज संगठन, कुकडे लेआऊट, नागपुर नं लेईस येको साठी उनको अभिनंदन ना धन्यवाद.

राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभा कन लका दुसरो अखिल भारतीय पवारी साहित्य सम्मेलन ला बहुत बहुत शुभकामना.

✦

आम्ही सुस्संकृत, संस्कारवान पवारना जसा स तसाच बेस से



डॉ. नामदेव दयारामजी राऊत,
अध्यक्ष, अखिल भारतीय भोयर पवार महासंघ, नागपुर

असाच नहीं कहया जात आम्ही राजा भोज का वंशज, पिढी दर पिढी समाज का भाई बहिन आघ बढ रह्यास तेम विरासत म मिल्या संस्कार कोच योगदान स जी. आज बी हमार पिढी पर्यंत हामन संजाय कन राख्योस. आन ओको श्रेय आपल पुरान पिढी ला देनु पढेन काहे क हमार दादा का परदादा का परदादा नवुन आजसीन ३५०/४०० साल पहले राजा भोज की मालवांचल म बसी धारा नगरी क आसपास सीन मुसलमान आक्रांताओ की अत्याचारी निती क कारण मालवांचल सोडकन ईत आयाता ती सब ला मालुम स. (अधिक माहिति साठी डॉ.ज्ञानेश्वर टेंभरे द्वारा लिखित पुस्तक ''पवारी ज्ञानदीप'' वाचो). ओमको एक समुह न भोरगढ/देवगढ किला म आश्रय लेकन वर्धा नदि क काठन काठन आपल आजिविका चलावन साठी शरण ली अन खेति बाडी म जीव लगाय कन खुब कष्ट करकन किसान बन गया. अन आपली ओळख भोयर/भोईर जात म्हनुन स्थापित कर ली। इनकी संख्या बैतुल, छिंदवाडा, नागपुर, वर्धा अन अमरावती जिल्हा म बहुतायत म स। दुसरो समुह नगरधन आयकन वैनगंगा नदि क काठनक खेडा पाडा म बस गयो अन ऐन समुह क लोक ना न पवार/पोवार जात म्हनुण आपली ओळख स्थापित कर ली आन बालाघाट, सिवनी, भंडारा व गोंदिया जिल्हा म बहुतायत म बस गया अन खेति बाडी करन लाग्या। वर्धा नदि क काठन बस्या ती वर्धा तटीय होय गया आन वैनगंगा नदि क काठन का वैनगंगा तटीय होय गया। वर्धा अन वैनगंगा तटीय सब खेति बाडीच करत होता, सबको रहन सहन, पेहरावो, रितिरिवाज, खानपान, बोली, सनबार इत्यादी एकसरीकाच होता। इन सब बातला ध्यान म धरकन हमार दादा परदादा अन प्रतिष्ठित सिख्या पढ्या बुजुर्ग समाज सेवी लोगनान विचार करयो क रहन सहन, पेहरावो, रितिरिवाज, खानपान, बोली, सनबार इत्यादी मिलता जुलता स तरी बी आम्ही अलग-अलग काहे स। तब प्रतिष्ठित लोगनान एक दुसरा क घर आवन जावन कि सुरूवात करी। अलग अलग तहसील, जिल्हा म मिटिंग को आयोजन भयो अन समाज का मोठा मोठा अधिवेशन करकन आज सीन ६०-७० साल पहलेच अधिवेशन म प्रस्ताव पारीत करकन निर्णय कर ल्यों क वर्धा अन वैनगंगा तटीय, जी मालवांचल की राजा भोज की धारानगरी क आसपास सीन आयकन वर्धा आन वैनगंगा नदी क आसपास बस गयास वुय सब एकच जात बिरादरी का लोग होय आन तब पासुनच रोटी बेटी की व्यवहार की बी चलन होय गईस. कई संबंध स्थापित भयास न चांगल प्रकारकन निभ बी रह्यास। इ सब हमार भोज वंशिय संस्कार क कारणच संभव होय भयोस.

तरूपन आब बी समाज म कई असामाजिक तत्त्व भेदभाव करनसाठी कोनतिच कसर नी सोडत। वैनगंगा क काठन रव्हनेवाला कई भाई ना कव्हस क वर्धा तटीय आपलसीन थोडा अलग स न वर्धा तटीय बी कव्हस क उनम न आपलम बराबर जमत नही। एको मुख्य कारण म्हनजे एकीकरण साठी खेडा पाडा म रव्हनेवाला समाज क लोग म प्रचार प्रसार म कमी, उसोच खेडा पाडा क सामाजिक संगठन म इच्छा शक्ति की कमी। जब क पन्नास साठ साल क पहंले पासूनच दुई शाखा को एकीकरण होय गयोस। शहर क संगठना म आपसी मेलजोल चांगलो स। आब आब कई नवा इतिहासकार पैदा होय रह्यास आन समाज म फुट पाडन की कोशीस चल रहीस पन वा सफल नही होता दिस रहीस। उनको काम फक्त समाज म भ्रम की स्थिति निर्माण करनु अन समाज म कटुता फैलाकन आपलो उल्लु सिधो करनको स।

बेरा (समय) बितत गई, पेट पालनसाठी अन शिकनसाठी कई भाउबहिन आपली जन्मभुमी सोडकन शहर म आया अन शिक्षण भयापर कई नौकरी म लाग्या कई धंदा पानी म लाग गया त कई भाई बहिनला ज्यु चांगलो काम योग्यता नुसार मिल्यों उच काम इमानदारी कन करसाठी लाग गया अन आब शहरकाच होय गया।

प्राचीन काल सीन शास्त्र क अनुसार मानुस ला आपली सुरवी जीवन जगन साठी कई महत्वपूर्ण नियम बनायास जिनको सबन पालन कऱ्या पाह्यजे, एमच सोळा संस्कार पालन की ज्या प्रथा कई समाज म प्राचीन काळ सीन (प्रचलित स) चली आय रहीस ओक बाराम हमार समाज क अधिकांस लोगनाला इ सोळा संस्कार क बारम माहिति नहाय तरी पन ऐमईन बारा-तेरा संस्कार पेक्षा जास्त संस्कार, जी गर्भाधान सीन त मृत्य क उपरान्त (अंतेष्टि) अंतिम संस्कार पर्यंत करस इ सब संस्कार आपल जातम न कळत आपोआपच घडकन आय जास। जसो गर्भाधान भयापर गर्भस्त स्त्री को व्यवस्थित पालन पोषन करनु, च्यार महिनापासून त सातव महिनापर्यंत पोटीला मायका म लायकन वोकी चोळी बांगडी करकन गर्भस्थ शिषु क रक्षनसाठी वोको चांगला खानपान करनु, जन्म भयापर शहद चटावनू, बारा दिन भयापर नवजात ला पाळना म डायकन पाळनाक खल की घुंगरी खानु, नाव धरनको, (नामकरण संस्कार) नवजात ला घर क बाहयर निकारनू, अन्नप्राशन, एक साल होता होता केस काढनका (मुंडन), नाक कान टोचनाका, शाळा म पठवनु अन मरणोपरांत वोकी चांगली सतगत करनु, कव्हन को अर्थ क आपल जात म मानुसला संस्कारवान बनावनसाठी येन सोळा संस्कारमका कई संस्कार जन्म पासुन त मरतपर्यंत मोठ सुंदर तरिकाकन न कळतच होय जास।

आजकाल आम्ही दुसर जातवालाकी नकल उतारकन आपली अकल खोय रह्यास काहेक धीरू धीरू आम्ही हमारा परम्परागत रीतिरिवाज जी पिढि दर पिढि सीन चलत आय रहयास उनला भुलत जाय रह्यास काहेक जी बी भाउना शहर म बस गयास उनक जवळ समय नहाय आन आधुनिकता क आंधळी दौड म मानुस मानुसला भुलत जाय रह्योस अन नवीन नवीन प्रथा जेम दिखावो स आडंबर स लय खर्चो स असी प्रथाला आब हमार समाज का मोठा लोगना बढावो दे रह्यास। आब गया वुई पुराना दिन जब आपल जातम ब्याहा काज लय सिधसाध पद्धतिकन होय जात होता, न कोनी दहेज को डर, न रुप्या पैसा को लेनदेन, अन आब दुसरा की देखासेखी करकन हमाराच कई भाईबंद नउन ब्याहाकाज म अनाप सनाप पैसा उडाय रह्यास, नाच गाना म टाईम बर्बाद करस न टाईम बे टाईम ब्याह लगावस।

मोठ खुशिकी बात स क आपल समाज म 'बाल विवाह', 'बहुविवाह' प्रथा खतम होय गईस तसोच 'सोडचिठ्ठी' प्रथा जी समाज म एक अभिशाप होतो वा बी आब समाप्त होय गईस। पन एक प्रथा जेको सोळा संस्कार म कहिन भी उल्लेख नहाय वा म्हणजे घरका कोणी की मृत्यु क बाद वोकी तेरवी मोठ धुम धाम कन करनही चाहे खेति बाडी बिकनु पडेन पन तेरवी भयाच पाह्यजे। तेरवी करनकी प्रथा कोनतही प्रकारकन समाप्त भई पाह्यजे असो कई सामाजिक संघठन आव्हान करस पन बोट पर मोजन लाइक लोग ना पालन करस।

उसो देख्या जाय त समाज न लय प्रगती कर लिस, कोनी असो क्षेत्र नहाय जेम हमार समाज का लोग नही होएन पन आब बी समझ की लय कमी स हात बढावन क अपेक्षा टांग खिचन की प्रवृति ज्यास्त देखना म आवस। अन समाज न ज्या प्रगति भईस का एत्रामच हामला संतुष्ट होय गया पाह्यजे, नही आब समाज साठी अन समाज क अंतिम छोर पर उभ व्यक्ति साठी लय कई करनकी आवश्यकता स अन एकसाठीच मजबुत समाज संगठन व एकता बनायकन राखन की आवश्यकता स। आवो सब संगठीत होयकन समाज ला खुब आघ बढावनको संकल्प लेवो। ✦

मुहावरें

*हाथ म माला, दिल म भाला ।

*झम-झम पानी, सम-सम रानी ।

*झेका देन खे लकड़ी लगय।

*ठोकर खान वालो च ठाकुर बनय।

*चूहा खे चिंधी मिली, बन गयो नवाब ।

एक की माय सरग उतरय,

चार की माय घर-घर कुतरय।

पवारी साहित्य मंडल की यशस्वी वाटचाल



पृथ्वीराज रहांगडाले,
अध्यक्ष, पवार समाज संगठन, नागपुर.

सब उपस्थित भाऊ-बहिन, पाहुना इनको सहृदय स्वागत।

आमरी सामाजिक धरोहर आमरी मातृबोलीभाषा पवारी (पोवारी, भोयरी) दिवस-दर-दिवस लुप्त होय रही से। येको जतन, सृजन, संवर्धन, प्रचार-प्रसार, साहित्य निर्माण को हेतु लक 'राष्ट्रीय पवारी साहित्य कला संस्कृती मंडल भारत' को विधिवत गठन, पंजीयन, आर्थिक बैंकिंग नियोजन, अना साप्ताहिक काव्य स्पर्धा, साप्ताहिक लेखव स्पर्धा, दैनिक सामान्य ज्ञान स्पर्धा को आयोजन मंडल को वाटस ॲप समुह पर अखंडित चल रही से. आमरा क्रियाशील सचिव कवि देवेंद्र भाऊ चौधरी को संचालन मा यव समुह सुरु भयेव अना धिरुधिरु पवारी साहित्यिक जुरत गया। तब पासुन आमरा समाज का बुद्धिजीवी साहित्यप्रेमी जुडत गया अना अथक काम कर रह्या सेति. 'पवारी बोलो, पवारी लिखवो' येव मूलमंत्र मनमा ठेयकन समाज मा प्रचार प्रसार कर रह्या सेति.

आमरो मातृबोलीभाषा आमरो पुरखाइनन् आपलो संग आमरी मायबोली मालवा लक यन् बैनगंगा-वर्धा तटीय प्रदेश मा औरंगजेब को अंतिम काम मा आनिसेन असो इतिहासकार अना भाषाविदहिन को कव्हनो से। बादमा यहां की स्थानीक बोलीभाषा इनको प्रभावलक पवारी, पोवारी, भोयरी नाव पडेव असो मानेव जासे।

केंद्रीय शासन की आजादी बाद की जनगणना सर्वेक्षण की माहिती को आधार पर बैनगंगा क्षेत्र को पवार/पोवार समाज की मातृभाषा पवारी/पोवारी नाव की बोली को उल्लेख मिलसे. सर्वेक्षण रिपोट अनुसार वा सालनसाल बोलचाल पासुन तेज गतिलक घट रही से. बालाघाट जिला गजेट मा पान ७२ पर भी आमरो मायबोली को 'पवारी' नाव लिखेव से। वहांच पुढ् लिखेव से का आता पवारी को बदले हिंदी, मराठी भाषा इनको जास्त उपयोग ये लोक कर रह्यासेती।

आमरो कनलक पवारी लिखित रुप मा आवन खुप उसिर भयेव। श्री यादोराव चौधरी की 'गीत गंगा', 'बिह्या का गाना' पासुन सुरवात भयी। येको मंघ् मंघ ऍड मनराज पटले की 'आधुनिक पवारी लोकगीत की दुय पुस्तिका, श्री जैपालसिंह पटले की 'पवार गाथा' अना पाच-सय किताब, श्री वल्लभ डोंगरे की 'पवारी कहावते, मुहावरे, शब्दकोष', श्री गोपीनाथ कालभोर की 'पवारी लोकगीत', डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे की 'पवारी ज्ञानदीप' अविस्मरणीय मौलिक रचना उजागर भयी. बादमा यन् किताबहिन को उपयोग शोधार्थीइनन् आपलो एम.फिल., पीएच.डी. प्रबंध मा करि सेन। तसोच पवार संदेश पत्रिका इ स १९८४ पासुन पवारी साहित्य को प्रकाशन नियमित कर रही से. डॉ.सु.बा. कुलकर्णी, डॉ. मंजु अवस्थी, डॉ. शारदा कौशिक, डॉ. भारती शरनागत अना श्री तुफानसिंह पारधी न खुप रिसर्च कर विविध विद्यापीठ लक आचार्य पदवी प्राप्त करि सेन.

एको बाद डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे न 'गूंज उठे पवारी', 'दुर्वांकुर', 'बुलंद करो पवारी', सरिखवी अनमोल रचना प्रकाशमान भयी।

राष्ट्रीय पवारी साहित्य कला संस्कृति मंडल भारत को वर्धापन दिवस-२०२० पर सर्वश्री सी.एच. पटले की 'पोवारी मायबोली अमर रहे', हीरालाल बिसेन की 'गांव शिवार' (कथा संग्रह), किताब् प्रकाशित भयी। बादमा, पवारी का ज्येष्ठ कवि देवेन्द्र चौधरी की 'मन को घाव' काव्य संग्रह, इंजी सुरेश देशमुख की 'भोयरी-मराठी शब्दकोष', मराठी ज्येष्ठ साहित्यिक ऍड लखनसिंह कटरे की 'पोवारी साहित्य

मंजूषा' प्रकाशित भयी। तसोच 'पवारी साहित्य सरिता' का अंक-१ अना २ ईत्यादि प्रकाशित भया।

आमरा ज्येष्ठ पवारी कवि देवेन्द्र चौधरीन् अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन यवतमाल, उस्मानाबाद मा सन २०१९-२०२० मा पवारी कविता प्रस्तुत करिन, या आमरो सबसाति गर्व की बात से। तसोच आमरो मंडल का उपाध्यक्ष ऍड लखनसिंह कटरेजी न् पवारी बोलीपर दुय वेबिनार देयकन पवारी की जगभर आवाज बुलंद करीन। तसोच या गर्व की बात से का आमरा समाज का वरिष्ठ समाज सेवी आदरणीय श्रीमान जयपालसिंगजी पटले इनन् काही धार्मिक ग्रंथ/संत वाङ्मय पवारी मा भाषांतर करी सेन - १. रामायण, २. महाभारत, ३. ग्रामगीता, ४. भोज गीतांजलि.

पवारी साहित्य कला संस्कृति मंडल की स्थापना ४.११.२०१८ ला भयी अना पहिलो पवारी साहित्य कला संस्कृति मंडल को वार्षिक सम्मेलन २०१९ मा तिरोडा, जिला गोंदिया मा सफलतापूर्वक संपन्न भयो. वक् बाद मा पोवार एकता मंच पारडी, पूर्व नागपुर क् सानिध्य मा कवि सम्मेलन लेनो मा आयेव. दुसरो अखिल भारतीय पवारी साहित्य सम्मेलन कारंजा (जिला वर्धा) मा २२.०३.२०२० ला होनेवालो होनको ऐन बेरापर करोना लाट आयोलक रद्ध भयेव। दुय वर्धापन दिवस पवार विद्यार्थी भवन, नागपुर मा जोरशोरलक सम्पन्न भया।

पवारी साहित्य कला संस्कृति मंडल की स्थापना भयी अना येन मंडल क् माध्यमलक् भरी अना बावरी १५० को जवर काव्य स्पर्धा, काही निबंध स्पर्धा अना सामान्यज्ञान स्पर्धा, शब्दकोष स्पर्धा साररवी स्पर्धाइनको आयोजन करनो मा आयेव त् अज आमरा समाज का छुपा हुआ 'हीरा-मोती' निरवरकन सामने आया सेति. आपलो समाज मा महान साहित्यिक, कवि, गीतकार अना अन्य क्षेत्र मा प्रगत सेत कयी का युट्युब चेनेल चल रह्यासेति तो पवारी आर्केस्ट्रा भी उभर रह्या सेति।

सबजन मिलकन जो कार्य करनो मा आवसे ओला सफलता जरूर मिलसे. 'अहंकार मा मणुष्य दुसरोला झुकायकर खुश होसे अना संस्कार मा खुदला झुकायकर' पवारी साहित्य कला संस्कृति मंडल को कार्य समस्त मंडल का सदस्यों क् सहयोग लक् सुचारू रूपलक् चल रही से। असोच सामने भी चलत रहे, सुखद बाटचाल चलत रहे, असी मी सहृदय मनोकामना करसू.

✦

देवला बास - माणूस ला घास

देऊळ को कळस गगनला भिडेव
शाळा को बांधकाम देणगीविना अडेव।।

दुध को अभिषेक गोटा को देवला
शाळा मा पोषण आहार नुसतोच नावला....।।

देऊळ को दरवाजा चांदीलका मढावसे
शाळा को दरवाजा पाणीलका सडसे....।।

देऊळ को झुंबरला हिरा मोती का खडा
शाळा को भितीईनला जाय रहीसेत तडा।।

देऊळ मा जायकन लोक पोथी-पुराण बाचसेत
शाळा मा क ग्रंथालयला उंदीर मामा खासेत...।।

देऊळ क दानपेटी मा गुप्तदान करसेत
शाळा साठी देणगी ला पावती मांगसेत...।।

हरसाल देव की भरावसेत जत्रा-यात्रा
शाळा मा पालक मेळावोला सिर्फ पालक सतरा...।।

पुजारी को गरो मा सोना - चांदी को हार
ठेकेदारी व्यवस्था लक गुरूजी की हो रही से उपासमार ।।

नही खानोवालो देवला पंचपक्वान को घास
शाळामाक खिचडी ला भात को नहीं आव बास ...।।

आता तुम्हीच सांगो कब् खतम् होये अंधविश्वास
शिक्या-सवऱ्या जवान टुरा - टुरी करण लग्या उपवास..।।

बाहर जायकन करसेत मौज मस्ती
खासेत आब ईजा - पिज्जा अना मारसेत ताव...।।

पृथ्वीराज रहांगडाले, नागपुर

पोवारी बोली - गौरव



प्रा. डॉ. रामलाल चौधरी
कला, वाणिज्य, विज्ञान पदवी महाविद्यालय, जवाहरनगर, भंडारा.
('रिसर्च जर्नी', ऑगस्ट, २०२० अंक २५२ पृष्ठ १८५-१८९ मा प्रकाशित लेख)

मानवी व्यवहाराचे प्रभावी साधन म्हणजे बोली होय. बोली ही प्रत्येक समुहाची वेगवेगळी असते. प्राणी जगतात बोलीला अनन्य महत्व आहे. बोलीशिवाय काही शक्य नाही. मानवी व्यवहाराचे बोली हेच एकमेव असे उत्तम साधन होय. त्यामुळेच बोली ही नुसती बोली न राहता लेखवणाची नव्हे, मानवी अभिव्यक्तीची पुढची पायरी भाषा या नावाने रंगरुपाला आली आहे. आजचा अभ्यासक वर्ग जिला लेखवणाची भाषा या नावाने संबोधतो आहे, परंतु ह्या लेखवणाच्या भाषेचा जन्मच मुळात बोलीतून झालेला आहे. याकरिता जागतिकीकरणाच्या काळात एखाद्या भाषेला चिरकाल जीवंत ठेवायचे असेल तर त्या त्या परिसरातील बोलीला सुद्धा जीवंत ठेवावे लागेल. त्या अनुषंगाने विशेषत्वाने मध्यप्रदेश व महाराष्ट्रात प्रचलीत असलेली पोवरी बोलीची वाटचाल कशाप्रकारे वृद्धिंगत होत आहे ते बघणार आहोत. जी शेकडो वर्षापासून प्रचलीत असलेली आणि विपूल प्रमाणात बोलली जात असलेली अशी लोकप्रिय बोली मात्र काही काळापूर्वी लोप पावते की काय अशी मनात भिती वाटत असताना वर्तमानात मात्र नवसंजीवनी प्राशन करून नवचैतन्य घेऊन नवाशालू लेवून नवनवलाईने, नव्यादमाने नांदायला लागली आहे. अशा नवलाईपूर्ण पोवारी बोलीभाषेचा जीवन प्रवास या ठिकाणी मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. जे बोलीभाषेच्या अभ्यासकाबरोबर इतर वाचकवर्गाला पोवारी बोलीविषयीची माहिती होऊन त्याबद्दल आपूलकी निर्माण व्हावी हा लेखवणाचा मूळ हेतू आहे.

पोवारी बोलीची व्यापकता फार विपूल प्रमाणात आहे. पोवार समाज देश-विदेशातील अनेक प्रांतात राहत असल्याने त्या त्या ठिकाणी कमी अधिक प्रमाणात पोवारी बोली बोलली जाते. बोलचालच्या माध्यमाने व्यवहारात पोवारी बोली अजूनही तत्पर असल्याचे दिसून येते. वर्तमानात पोवारी बोली साहित्याच्या रूपाने आपले अस्तित्व जगासमोर सिद्ध करायला सरसावली आहे. ते ती सिद्ध पथावर धावू लागली आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'पहलो राष्ट्रीय पवारी बोली-भाषा सम्मेलन' दिनांक ३ फरवरी २०१९ ला महाराष्ट्राच्या पूर्व टोकाला असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तहसील या परीक्षेत्रात गुमाधावडा या नावाने ओळखवण्यात येणाऱ्या लहानशा खेडेगावात परंतू अतिशय शानदार आणि भव्य स्वरूपात मोठ्या थाटात हा सम्मेलन पार पडला. या पहिल्या सम्मेलनाच्या आयोजनावरुन पोवारी बोली-भाषा किती समृद्ध असून तिची पुढची वाटचाल कशी आहे याचा जवळून अंदाज आलेला आहे. पोवारी बोलीभाषेने या पहिल्या सम्मेलनाने आपली यशस्वीता सिद्ध केलेली आहे यात तीळमात्र शंका नाही. त्याचाच परिणाम म्हणून दुसरे राष्ट्रीय पोवारी बोलीभाषा सम्मेलन घाटगे कारंजा याठिकाणी होऊ घातला होता परंतू जागतीक महामारीच्या घोषनेने भारतात देशबंदी लागल्याने सम्मेलन होऊ शकले नाही.

अर्बुदगिरी-सतपडा की धरती,
नर्मदा-बैनगंगा की धार
युगो-युगो से है वे गाती,
पवार शौर्य गाथा का सार ।।धृ।।

महर्षि परशुराम ने किया,
क्रोध में क्षत्रियों का संहार।
तब यह धरती हुई निक्षत्री,
मच गया सर्वत्र हाहाकार।।

भारत भू पर रहा न कोई,
उठा सके र क्षा का भार।
यज्ञ आबू पर कर मुनियों ने,
किया प्रगट 'क्षत्रिय पवार'।।१।।

कुलदैवत शिव, जगनारायण,
माँ अम्बे महामाया नाम।
शक्ति युक्ति उस माँ से मिल गई,
भारत भू पर चमका नाम।।

देवी सरस्वती प्रशन्न उन पे,
साहित्य में दी प्रगती कराय।
पवार तो सही क्षत्रिय थे ही,
अब वो ब्रह्म-क्षत्रिय कहलाय।।३।।

इसा पूर्व पांच सौ में हुए,
महाप्रतापी आदित्य पवार।

विक्रमा दित्य भरतरी से हुई,
उज्जैनी नगरी विख्यात।।
आठवी सदी में कृष्णराज ने
उज्जैनी का सम्हाला राज।
दसवी सदी में बैरिसिंह ने,
बसाई सुंदर नगरी धार।।४।।
मुंज-भोज ने बाहुबल से,
दिया मालवा को साम्राज्य बनाय।
ज्ञानप्रसार के लिए धार में,
भोज ने दी भोजशाला बनवाय।।
राज-वैभव, साहित्य कलाएँ,
बन गई मालवा की पहचान।
स्वर्णयुग भारत में लाया,
धन्य धारा नगरी के पवार।।५।।
नए युग की अब धुन में आकर,
प्रगती में है किया प्रवेश।
किसान की किसानी उजडी,
पडी नौकरी पर नजर विशेष।।
अब तो नौकरी प्रधान हो गई,
फिर व्यापार हुआ हितेश।
पवारों के बने इरादे,
चमक रहें हैं देश विदेश।।६।।

(पवारी ज्ञानदीप पान नं. १ ते ३)

'पवारी ज्ञानदीप' या पुस्तकात डॉ. ज्ञानेश्वर टेंभरे यांनी 'क्षत्रिय पवार गौरव गीता' च्या माध्यमाने पोवारांचा इतिहास रेखाटलेला आहे.

पोवारी बोली जवळून समजून घेण्यासाठी या ठिकाणी पोवारी बोलीभाषेतील साहित्यरचनेचा नमुना म्हणून काही रचना या लेखात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. यामागचा मूळ हेतू असा आहे की ज्यांची पोवारी बोलीसी ओळख नाही अशा वाचन प्रिय वाचकांना शुद्धा पोवारी बोली सहज वाचता-समजता येईल आणि एवढेच नाही तर पोवारी बोली जाणून घेण्याची अभिलाषा मनात जागृत होईल.

मायबोली पोवारी

मोलासे अभिमान मोरो पोवारी बोलीको
मोरी शान मान अन पयचान आय पोवारी
घर-घरमा बोलसेजन अभिमानलक पोवारी
खेती-बाडी अन बजारहाटमा बोलसेजन पोवारी
आपलो समाजबांधव संगमा बोलसेजन पोवारी
करुसू अभिमान मोरी मायबोली आय पोवारी
लिखनपठनसाठी सिकुसू हिंदी मराठी इंग्रजी
आमरो पिठी दर पिठीन राखीन खेतीबाडीमा
समयक गतीचक्रलक काल बदलत गयेव
आता समाधान नाहाय फक्त खेतीबाडीमा
लिखपठसान नाव कामवनका दिवस आया
खेतीबाडीलक बाहर निकलनका दिवस आया
लिखपठकन समाज गौरव पतावा फैलावो देशविदेशमा
पर नार नही टुटे पायजे आपलो मातृभूमीकी
याच पयचान आय क्षत्रीय पोवार इनकी

- कवी रामरुप

कवी या ठिकाणी आपल्या बोलभाषेविषयीचा सार्थ अभिमान बाळगताना दिसतात. आजच्या या यांत्रिक युगात जर बोलीभाषा टिकवायची असेल तर समाजबांधवांनी दैनंदिन व्यवहारात आपल्या बोलीला टिकवून ठेवणे अत्यावश्यक आहे..

अमराई

आंबा की अमराई वो अमराई
कोण गावको पटीलकी आय बाई
गावको आकरला लगीसे अमराई
कोण पटीलकी आय या अमराई
अमराई को आंबा खालं बसबन बाई
तीजको महिनामा तपसे लाई-लाई
सकारकी निकल्या बाई दुपार भयगई
नही आयेव फुपाको गाव भूक बेरा भई
आंबाको अमराईमा कोयार गाना गावसे
राघो मैना पारको आंबा खाल्या पाडसे
सेंदरया दगडया लंगडया सारवरघोओी
आंबा रस बने चांगलो बटकी-बटकी
गावको पटीलकी आय अमराई
येन अमराईकी केती गाऊ नवलाई
चल-चल बडीबाई चलनकी कर घाई
आंबाको अमराईमा मनकी संतुष्टी भई
बाजा बजसे गावगली गदरसे
अहेर बेरा भई असो सांगसे
फुपा घरको बिया बाई अहेर बेरा भई
चल-चल बडी बाई अहेर बेरा भई

- कवी रामरुप

कवी या कवितेतून ग्रामीण जीवनाची वास्तवता रेखाटत आहेत. तत्कालीन समाज जीवनाचे वास्तव

चित्रण चित्रीत करीत आहेत. ज्यावेळी येण्या-जाण्याची फारसी साधणे नव्हती त्यावेळी लोक पायी येणे-जाणे करीत होते. सकाळची दुपार व्हायची तहान भूक लागायची असाच प्रसंग कवी याठिकाणी चित्रीत करीत आहेत.

पोवारी बोलीभाषेत प्रचलीत लोकगीत, कृषीगीत, विवाहगीत याप्रकारे अनेक असे प्रचलीत गीत उपलब्ध आहेत. पोवारी बोलीभाषेतील अनेक लोकगीत हे मोठया आदरभावाने गायली जात होती. त्याचाच पुण्यप्रभाव की आज हे लोकगीत आपणास सहज उपलब्ध होत आहेत. गतकाळात या पोवारी लोकगीतांना लिपीबद्ध करण्यात आले नव्हते. परंतु आज वर्तमानात समाज बांधवांनी आपल्या पोवारी बोलीभाषेविषयीचे प्रेम निष्ठा आपुलकी व तिचे जतन करण्याची अभिलाषा दाखवत जे-जे म्हणून हाती येत गेले ते-ते पुस्तक रुपाने समाजापुढे मांडण्यात आपली पराकाष्ठा दाखविली आहे. भाषेचे जतन करणे हे एक तसे महान कार्य आहे. भाषेबद्दल बोलल्या जातेच की भाष टिकेल तर समाज टिकेल. बोलीभाषा निर्झर झऱ्याप्रमाणे झरझरत राहिली की तिची भाषा ही गंगेसारखी प्रवाही राहते यात दुमत नाही. करिता बोलीभाषेचे जतन करणे हे अगत्याचे ठरते आहे. पोवारी लोकसाहित्यात विविध प्रकारच्या गीतांचा समावेश असल्याचे दिसून येते. त्यापैकी काही गीतांचा उल्लेख करुन पोवारी बोलीभाषा किती व कशी समृद्ध आहे याची वाचक वर्गाला जवळून ओळख होईल.

विवाह गीत

आपल्या भारतीय संस्कृतीत पूर्वीपासून शुभप्रसंगी आनंद व्यक्त करण्याची परंपरा आहे. विवाह संस्कार शुद्धा शुभकार्य असल्यामुळे याप्रसंगी वेगवेगळया विधीच्या वेळी त्या-त्या विधीची विविधता विस्तारणारी अशी शब्द रचना म्हणजेच विवाह गीत होत. ही विवाह गीत गाण्याची प्रथा फार पूर्वीपासूनची सुरु आहे. ह्या लोकप्रिय अशा भारतीय सुसंस्कृतीचे जतन करीत पोवार समाजात शुभप्रसंगी प्रसंगानुसार आपल्या बोलीभाषेत गीत गायणाची प्रथा प्रचलीत आहे. पूर्वीच्या काळ असल्या प्रकारचे गीत एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे तोंडी गाण्याच्या माध्यमानेच हस्तांतरीत झालेली आहेत. परंतु आता पुस्तक रुपाने उपलब्ध आहेत. पोवारी लोकसाहित्याने आपले योगदान देऊन इतर साहित्यात विशेषतः हिंदी मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे.

मांडो सुताई गीत

बारा डेरीको मांडो गडीसे ।।धृ।।
मांडोपर मंडाईन ओला बेरु
बेरुइनपर बिछाइन जांभूरकी डारा
जांभूरकी डारीरवाल्या शोभसे आंबाकी तोरन ।।१।।
जवाई रामलाल मांडो सुतसे
सूत गोईता जवाई बापू तुमरो सेला गोरसे
तोरन गोईता जवाई बापू तुमरो काश्टो सुटसे ।।२।।
कुकुमा डोईता सुशमा वो बाई
तुमरी अंगोरी लाल भई से
मांडोमा तोरन लगी से '२' ।।३।।

पोवार समाजात लग्नसोहळ्याच्या प्रसंगी बारा डेरींचा मांडव घातला जातो. या मांडव/मंडपावर हिरव्या-हिरच्या जांभळीच्या डारी/फांद्या झाकल्या जातात. पोवार समाज हा शेती व्यवसायाशी जुळलेला समाज आहे. या समाजात विविाहाचा काळ हा शक्यतोवर उन्हाळ्याचा काळ अधिक सुलभा काळ समजण्यात येत होता. या दिवसात शेतीची कामे अधिक नसल्याने मुबलक वेळ मिळत असे. लग्नप्रसंगी पाहुणे मंडळीची गैरसोय होऊ नये तसेच उन्हापासून बचाव व्हावा या हेतूने हिरव्या डारींचा उपयोग करण्यात येत होता. नवनवीन उपाययोजना शोधून काढण्यात पोवार समाज पूर्वीपासूनच अग्रसेर आहे. जेव्हा-जेव्हा समस्या उद्भवत गेली तेव्हा-तेव्हा समाजाने त्यावर मात केली.

मांडव तयार झाल्यानंतर जवाई रामलाल मंडपाला सुताने सुततो. त्यावेळी उपस्थित महिला हा गीत गातात. या गीताच्या माध्यमाने पोवारी समाजाची विवाह प्रथा दिसून येते. जवाईबापू जेव्हा मांडव सूततो तेव्हा त्यांचा सेला जमिनीवर घोरतो. जवाई जेव्हा आंब्याच्या पानांची तोरण मांडवाला बांधतो तेव्हा त्यांचा काश्टा सुटतो. याठिकाणी उपहासात्मक प्रसंग घेतला आहे. मुलगी सुशमाबाई या शुभकारयाची सुरूवात कुंकवाचा टिळा लावून करतात. कुंकवाचा टिळा लावता-लावता सुशमाबाईची आंगटी/बोट लाल झाली आहे. कवी या ओळीतून पती-पत्नीच्या प्रेमभावाचे वर्णकर करतात.

पोवार समाजात विवाह प्रसंगी अनेक नेंग-दस्तूर पार पाडण्यात येतात. प्रत्येक नेंग साजरा करीत असताना गीत गाण्याची प्रथा आहे. या गीताच्या माध्येमाने नेंगांची संपूर्ण माहिती सांगण्यात येते. या शुभप्रसंगी नेंगांचा काय महत्व आहे हे या गीतातून मांडण्याचा प्रयत्न असतो.

पवार समाज की माय बोली पवारी - सृजन, संवर्धन



डॉ. (सौ.) मनिषा तारेंद्र रहांगडाले
रामनगर, तिरोड़ा, जि. गोंदिया

टीम वर्क, दृढ़विश्वास, समर्पण अना सहनशिलता सफलता की कुंजी से. समाज सुधारक, समाज संवर्धक, संत, क्रांतिकारी, समाज मा सुधार, विकास, शिक्षण प्रचार प्रसार साठी, मानवी मूल्य, सांस्कृतिक मूल्य जपनसाठी लड़नेवालो इनला कदम कदम पर विघ्न आवसेत. समाजमाकाच आपला भाईबंद रस्ता अवरोधन बन् सेती. एक सामान्य वृत्ति 'टांग ओढ़ो या गोटा मारो'. एन प्रवृत्ती का शिकार ज्ञानदेव, तुकाराम सरिखा साधू-संत, भगतसिंह, आजाद, सावरकर सरिखा क्रांतिकारी ज्योतिबा फूले, गाडगे बाबा सरिखा अनेक समाज सुधारक मुक्त भोगी सेती.

अज भी याच परिस्थिति से. काही करनो मंजे सहनशक्ति की समय-समय पर परीक्षा देनो पड़से। जगप्रसिद्ध चित्रकार व्हिंसेंट व्हॅन गॅग को विधान ''टु सफर विदाउट कंम्प्लेंट इज दी वोनली लेसन वी ह्याव टु लर्न इन लाइफ.''आपलो हिस्सा मा आयो आयुष्य अना वोकोमाका भोग कोनतिबी तकरार न करता, सहन करत जानो, यवच एकमेव धड़ा आपुनन् आपलोच जीवन पासुन लेनो सरिखो से. सहनशक्ति की परिसीमा होयेवरी जिनन् त्रास सहन करीन वयच आपलो लक्ष पूर्तिवरी पहुंच सक्या. समाज साठी काहीतरी साजरो करनो यवच उनको अपराध होतो.

अज भी असीच वस्तुस्थिती से. आता उदाहरण देनकोच भयव त दूर न जाता 'आपली मातृभाषा को सृजन, संवर्धन, प्रसार प्रसार' कोच लेव. ईस्वी सन २०१८ वरी यन् उद्देश्य पूर्तिसाठी आपलो समाज का काही आपली मातृभाषा प्रेमी पुढ् आया खरा, पर व्यक्तिगत सीमावरीच वय प्रयत्नशील रह्या। समग्र उद्देश्य पूर्तिसाठी मुहुन पवारी साहित्य कला संस्कृति मंडल भारत की स्थापना करी गई। स्थापना दिवस पासुनच यन् अभियान ला गति मिलन लगी। लेखक, कवि जुड़न लग्या। काव्य स्पर्धा, कथा कहानी, काव्य संग्रह रचना का पंख फुट पड्या। पहिलो अखिल भारतील पवारी साहित्य सम्मेलन, पवारी स्मारिका प्रकाशन, अखिल भारतीय पवारी कवि सम्मेलन, पहिलो स्थापना दिवस, सारा समोराह सफलतापूर्ण साकार होन लग्या। पवार समाज को सब सभा मंचयीन पर पवारी गूंजन लगी। बिह्याइनमा पवारी गाना, मंगलाष्टक गूंजन लग्या।

अना मंग देखने को से - इर्ष्या लक जरत काही लोक आक्रमक भया। विध्वंस सुरु भयेव। ''इंजन तोड़फोड़ करिस या पटरी की श्रृंखला कडी तोडीस त रेलगाड़ी तहस-नहस होसे'', यन् इरादा लक काम सुरु करिन। आमी काम मा मग्न त ये लोक राडा मा मस्त। तुफान चलाइन 'नाव' को - पवारी गलत! पवारी कवनेवाला गलत! पवारी साहित्य कला संस्कृति मंडल गलत। कुप्रचार जोर-शोर ल करिन सुरू। 'पवारी अना पोवारी' को वाद की आग भड़काईन। आमी आपलो काम करत गया। 'आमरी पवारी/पंवारी/पोवारी/भोयरी इत्यादि सभी नाव स्विकृति, जेला जो नाव पसंद उ लेव, आमला काही आपत्ती नही'' यव जब् आमरो पक्ष लोकं इनला पटेव अना सामाजिक एकता सर्वोपरि समजमा त ये विरोध करनेवाला सोशल मीडिया पर चिल्लाय-चिल्लाय थक गया पर पवारी साहित्य कला संस्कृति मंडल की सुदृढ़ता अना लोकविश्वास ला किंचित भी धक्का नही लगाय सक्या अना वय सेनानी पुढं बढतच गया।

आखिर विजय आमरो सहनशक्ति की भई। आमरो समर्पित भाव की भई। टीम वर्क की भई।

जय पवारी/पोवारी

मोरो अध्ययन मा आमरी मायबोली पवारी



- डॉ. (सौ.) भारती तारेंद्र शरणागत,
शासकीय उत्कृष्ठ विद्यालय, बालाघाट.

